# आकाशवाणी नागपूर,

# प्रादेशिक वृत्त विभाग

# प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

# मंगळवार दिनांक ०८ जुलै २०२५

## ठळक बातम्या

- घटना दुरुस्ती करून राज्य घटनेच्या मूळ गाभ्याला धक्का लावता येत नाही याचा सरन्यायाधीश भूषण गवई यांनी केला पुनरुच्चार.
- राज्यातल्या गिग वर्कर्सना सामाजिक सुरक्षा देण्यासाठी स्वतंत्र कायदा करणार.
- ग्रंथालयांच्या अनुदानात ४० टक्के वाढ करण्याच्या प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मान्यता.
- पूर्व विदर्भात पावसाची संततधार, नद्या-नाल्यांना पूर आल्यानं अनेक मार्गांवरील वाहतूक ठप्प.

सरन्यायाधीश भूषण गवई- सत्कार

घटना दुरुस्ती करून राज्य घटनेच्या मूळ गाभ्याला धक्का लावता येत नाही, याचा पुनरुच्चार सरन्यायाधीश भूषण गवई यांनी आज केला. मुंबईत विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात ते उपस्थितांना संबोधित करत होते. युद्ध आणि संकटाच्या काळात भारतीय राज्य घटनेने देशाला जोडून ठेवलं, असेही त्यांनी सांगितलं. घटनेची मूलभूत तत्त्व आणि मूलभूत अधिकार हे घटनेचा आत्मा आहेत. या दोघांचा एकत्र विचार करून सामाजिक आणि आर्थिक न्यायासाठी काम केलं पाहिजे असं ते म्हणाले. कुठल्याही पदासोबत जबाबदारीही येते आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे पाईक असलेल्या मला सरन्यायाधीश पदाची जबाबदारी मिळाली ही अभिमानाची गोष्ट आहे असं ते म्हणाले. यावेळी त्यांनी राज्य घटनेमागील बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका उपस्थितांना समजावून सांगितली.

*बाबासाहेब म्हणाले की,**We have provided a federal structure** परंतु हे फेडरल स्ट्रक्चर अमेरिकेसारखं नाही आहे. **Under the American federal***

***system there are two things which do not suit the Indian Society.* *बाबासाहेब म्हणाले, माझ्या मते संपूर्ण देशाकरता एकच घटना अभिप्रेत आहे आणि अमेरिकन कॉन्स्टिट्यूशन प्रमाणे संघराज्यासाठी वेगळी घटना आणि राज्यांसाठी वेगळी घटना हे जे प्रोव्हाइड करण्यात आलेल होत ते म्हणाले की चुकीच आहे.***

तत्पूर्वी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. हा सत्कार म्हणजे राज्यातल्या जनतेचा आशीर्वाद असल्याची प्रतिक्रिया त्यांनी सत्काराला उत्तर देताना गवई यांनी व्यक्त केली. व्यापक जनहितासाठी गवई यांनी कायद्याचा वापर केला असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. पहिल्यांदाच सरन्यायाधीशांचा सत्कार विधान भवनात होत असल्याची प्रतिक्रिया एकनाथ शिंदे यांनी दिली. तर हा सत्कार ऐतिहासिक असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. विधान परिषद सभापती राम शिंदे आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते.

विधेयकं

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग स्थापन करण्यात यावा, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग स्थापन करण्यात यावा आणि महाराष्ट्र विनाअनुदानित खासगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था प्रवेश आणि शुल्क विनियमन सुधारणा ही विधेयकं सभागृहात मंजूर करण्यात आली.

गिग वर्कर्स

राज्यातील झॉमेटो, स्विगी अशा प्लॅटफॉर्मवर काम करणाऱ्या गिग वर्कर्सची संख्या भविष्यात वाढणार असून, सरकार त्यांच्यासाठी स्वतंत्र कायदे निर्माण करणार असून, त्याच्या मसूद्यावर सध्या काम सुरू असून, त्याद्वारे या कामगारांना सामाजिक सुरक्षा देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, अशी माहिती कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी विरोधी पक्षांनी, नियम २६० अन्वये मांडलेल्या ठरावाला उत्तर देतांना दिली. संघटित कामगारांपेक्षा, असंघटित कामगारांची संख्या वाढलेली असून, त्यांच्या कल्याणाकरता राज्यात ६८ व्हर्चुअल बोर्डची रचना प्रस्तावित असून त्या दिशेने त्यांची नोंदणी, त्यांची सामाजिक सुरक्षा यांचा विचार करुन

त्यांना न्याय देण्यासाठी काम सुरू असल्याची माहिती, फुंडकर यांनी दिली. बोगस माथाडी कामगारांप्रकरणी, सरकार कुणालाही पाठीशी घालणार नाही. जे कुणी अधिकारी या प्रकरणी दोषी असतील, त्यांची एसआयटीमार्फत चौकशी केली जाईल, याचा पुनरुच्चार फुंडकर यांनी सभागृहात केला. गिरणी कामगारांना घरे देण्याची अंतिम कारवाई गृहनिर्माण धोरणाच्या अधीन असून, पात्र लाभार्थी ओळखून त्याबाबतची कारवाई कामगार विभागानं पूर्ण केल्याची माहितीही फुंडकर यांनी दिली.

## नवीन शैक्षणिक धोरण

राज्यातील अकृषी सार्वजनिक विद्यापीठ आणि अशासकीय महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर रिक्त पदे भरल्यास नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीनुसार उच्च शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यास मदत होणार आहे. राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमधील आणि अशासकीय महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर पदभरती रिक्त पदांच्या भरतीस सकारात्मक प्रतिसाद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून देण्यात आला. तसेच अभियांत्रिकी शासन अनुदानित संस्थांमध्ये १०० टक्के पदभरतीसही अनुकूलता दाखवण्यात आली. अकृषी विद्यापीठातील शिक्षक आणि शिक्षकेतर पदांचा आकृतिबंध लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावा, अशा सूचनाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या. विधानभवन येथे उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या विविध विषयांवर आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.  राज्यात तंत्रज्ञान विद्यापीठांची संख्या कमी असून, ही विद्यापीठे पूर्ण क्षमतेने सुरू ठेवणे गरजेचे आहे. यामुळे विद्यार्थ्यांना अधिक संधी प्राप्त होतील व गुणवत्ता वाढेल. नागपूरच्या लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ-एलआयटी मध्ये १०५ अध्यापकीय पदे, एक शिक्षक समकक्ष पदांस मंजुरी देण्यात यावी असे निर्देश मुख्यमंत्री यांनी दिले.

## ग्रंथालय अनुदान

ग्रंथालयांच्या अनुदानात ४० टक्के वाढ करण्याच्या प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली आहे. हा प्रस्ताव तातडीने वित्त विभागाकडे पाठवण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. राज्यातल्या अर्धशतक पार केलेल्या सार्वजनिक ग्रंथालयांना प्रोत्साहनपर विशेष अनुदान मंजूर करायलाही मान्यता

मिळाली आहे. राज्यातल्या विद्यापीठं आणि अशासकीय महाविद्यालयांमधल्या रिक्त पदांची भरती, शासन अनुदानित अभियांत्रिकी संस्थांमध्ये १०० टक्के पदभरती या मागण्यांनाही मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. विधानभवनात उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

संसदीय राजभाषा

केंद्रीय गृह मंत्रालयातलं संपूर्ण कामकाज सध्या हिंदी भाषेत होत असून, यानंतर मराठी भाषेतल्या पत्रांना मराठी भाषेतूनच उत्तर दिलं जाईल तसंच उत्तरासोबत हिंदी अनुवाद दिला जाईल असं, संसदीय राजभाषा समितीचे निमंत्रक खासदार डॉक्टर दिनेश शर्मा यांनी सांगितलं आहे. मुंबईत राजभवनात संसदीय राजभाषा समितीच्या नऊ सदस्यांनी शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची आज भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते. देशातल्या प्रादेशिक भाषांना चालना देणं, तसंच हिंदी भाषेला 'सहयोगी भाषा' म्हणून प्रस्थापित करणं, या उद्देशानं समिती काम करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

विदर्भ पाऊस

विदर्भातील नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये आज मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून अमरावती, वर्धा, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. उद्या देखील नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये जोरदार पर्जन्यवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे तर चंद्रपूरमध्ये ऑरेंज अलर्ट कायम राहणार आहे. दरम्यान नागपुरात गेले दोन दिवस कमी अधिक प्रमाणात पावसाची संततधार सुरू असून कमाल तापमानात मोठी घट झाली आहे. अनेक सखल भागांमध्ये पाणी साचण्याची समस्या उद्भवते आहे. गोंदिया जिल्ह्यात दोन दिवसांपासून पावसाची संततधार सुरू असून वैनगंगा नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. काल दिवसभर झालेल्या पावसामुळे तिरोडा तालुक्यात एका व्यक्तीचा मृत्यू झाला. पावसामुळे जिल्ह्यातले २१ मार्गांवरची वाहतूक ठप्प झाल्यानं विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी आज सर्व शाळांना सुट्टी जाहीर केली. गडचिरोली जिल्ह्यातही रात्रीपासून संततधार पाऊस सुरु असून, नद्या- नाल्यांना पूर आल्यानं १६ मार्गांवरील वाहतूक ठप्प झाली आहे. दरम्यान गोसेखुर्द धरणातून होणार पाण्याचा विसर्ग टप्प्याटप्प्यानं वाढवण्यात येणार आहे.

त्यामुळे नदीकाठवरच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. भंडारा जिल्हयात तुमसर तालुक्यातल्या तामसवाडी इथं एका गर्भवती महिलेला रुग्णालयात नेण्यासाठी येणारी रुग्णवाहिका पावसामुळे झालेल्या चिखलात अडकली. त्यामुळे या महिलेला रुग्णवाहिकेपर्यंत पायीच जावं लागलं.

संप

महावितरणच्या २३ पैकी ६ कर्मचारी संघटनांनी उद्या एका दिवसाचा संप पुकारला आहे.या संपकाळात वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणकडून आपत्कालिन नियोजन पूर्ण झाले राज्यभरातील यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. नागरिकांनी वीजपुरवठ्याबाबत कोणत्याही नकारात्मक आणि चुकीच्या संदेशावर विश्वास ठेवू नये. वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी पर्यायी यंत्रणा २४ तास युद्धपातळीवर सज्ज राहणार आहे. वीजपुरवठ्याबाबत काही तक्रारी किंवा शंका असल्यास २४ तास सुरू असलेल्या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा आणि संपाच्या कालावधीत सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

प्रधानमंत्री पीक विमा

कृषि क्षेत्राच्या उत्पादन वाढीच्या दरामध्ये फळ पिकांचा प्रमुख सहभाग आहे. फळ पिकांचे बाजारमूल्य अधिक असल्याने शेतक-यांना चांगले उत्पन्न मिळते. मात्र फळपिकाचे अपेक्षित उत्पन्न न आल्यास येणारा तोटा हा मोठा असतो. ही बाब लक्षात घेता अमरावती विभागात प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजना वर्ष **2024-25** व २०२५-२६ या दोन वर्षासाठी राबविण्यासाठी राज्य शासनाने मान्यता दिलेली असून, अमरावती विभागातील शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागीय कृषि सहसंचालक यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

किमान आधारभूत किंमत

किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत रब्बी हंगाम **2024-25** मधील धान आणि भरडधान्य खरेदीसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. यापूर्वी **30** जून ही अंतिम मुदत होती, मात्र भंडारा जिल्हयातील अनेक शेतकऱ्यांची खरेदी प्रक्रिया अद्याप पूर्ण न झाल्यामुळे, शासनाने काल जारी केलेल्या परिपत्रकानुसार खरेदीची अंतिम मुदत आता **20** जुलैपर्यंत वाढवली आहे.

खाली पडून मृत्यू

मोकाट कुत्रा अंगावर धावून आल्याने बचाव करण्यासाठी पळत असताना  पाचव्या मजल्यावरून खाली पडून बारा वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना नागपूरच्या कळमना पोलीस स्टेशनच्या हद्दीत पवनगाव इथं घडली. या घटनेबद्दल सर्वत्र हालहाल व्यक्त केली जात आहे.

******